# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक १३ /१०/२०१७

सभा सूचना क्र.२६ दु ११.३० वा.

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. सखाराम शंकर महाडिक सूचक :- मा.श्रीम. दिक्षा दिपेश घरत<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० हया वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध विकास काम करण्यासाठी तांत्रिक सल्लागारांची नियुक्ती करणे.(हया मध्ये तलाव, बगीचे सुशोभिकरण, ब्रिज इमारती वैगेरे.) (बी-२निविदा दर) (द्वितीय फेर निविदा) | ठराव :- सदर कामास मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ०६ दि. १३/०६/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्टया मे.के.के.टेक्नो ट्रेड हयांचे निविदा दर निविदा सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० करिता सर्वात कमी व वाजवी आहे व निविदेतील प्राप्त निम्नत्तम तांत्रिक सल्लागार मे.के.के.टेक्नो ट्रेड हयांना दिनांक २५/०७/२०१७ रोजी वाटाघाटीकरीता पत्र दिले असता त्यांनी आपल्या दि. २९/०७/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे निविदेमध्ये भरलेले दर २.४४% चुकीने भरलेले असून ५.४४% इतके दर भरणा करणे अपेक्षित होते असे म्हटले आहे. त्यामुळे २.४४% हया चुकीने भरलेल्या दराने काम करणेस इच्छूक नसल्याचे कळविले आहे. तरी मे.के.के.टेक्नो ट्रेड हयांची निविदा रद्द करुन त्यांची इसारा रक्कम जप्त करणेत यावी.तसेच द्वितीय लघुत्तम तांत्रिक सल्लागार मे.व्ही.जे.ए.आय. कन्सल्टंट प्रा.लि. यांना सन २०१७-१८ व सन २०१८-१९ करीता मे.व्ही.जे.ए.आय.आर्किटेक्ट यांना सन २०१८-१९ व सन २०१९-२० वाटाघाटीकरीता २९/०७/२०१७ रोजी पत्र देण्यांत आले आहे. दि. ०१/०८/२०१७ रोजी द्वितीय लघुत्तम तांत्रिक सल्लागार मे.व्ही.जे.ए.आय. कन्सल्टंट प्रा.लि. यांच्या सोबत वाटाघाटीने दर कमी करुन घेणेकरीता सविस्तर चर्चा करण्यांत आली असून त्यांनी निविदेमध्ये भरणा केलेले दर योग्य व वाजवी असल्याचेआपल्या दि. ०२/०८/२०१७ रोजीच्या लेखी पत्राद्वारे कळविले आहे. तसेच मे.व्ही.जे.ए.आय.आर्किटेक्ट यांच्यासोबतही वाटाघाटीने दर कमी करुन देणेबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली असून त्यांनी निविदेमध्ये सन २०१८-१९ करीता भरणा केलेले दर अंदाजपत्रकीय रकमेच्या ४.५% इतके करुन दिले असून (वाटाघाटीने) अंदाजपत्रकीय रकमेच्या ४.२५% इतके करुन दिले असून सन २०१९-२० करीता भरणा केलेले दर योग्य व वाजवी असल्याचे आपल्या दि. ०२/०८/२०१७ रोजीच्या लेखी पत्राद्वारे कळविले आहे. तरी मे.व्ही.जे.ए.आय. कन्सल्टंट प्रा.लि.यांचे निविदा दर सन २०१८-१९ करीता वाटाघाटी अंती मे.पी.एम.ए. आर्किटेक्ट हयांच्या तुलनेत जास्त असल्याने नामंजुर करण्यांत येत आहेत व मे.पी.एम.ए.आर्किटेक्ट हयांचे निविदा दर सन २०१८-१९ करीता वाटाघाटी |

| | | |
|---|---|---|
| | | अंती कमी असल्याने मंजुर करण्यांत येत आहेत. तसेच सदर दराने निविदेमधील भाग घेतलेल्या अन्य निविदाधारक (तांत्रिक सल्लागार) काम करणेस इच्छूक असल्यास त्यांची पॅनलवर नियुक्ती करुन घेणेकरीता दि. ०२/०८/२०१७ रोजी पत्र देण्यांत आले होते. तरी सदर पत्रास अनुसरुन मे.व्ही.जे.ए.आय.कन्सल्टंट प्रा.लि., मे. एकोटेक कन्सल्टंट प्रा.लि. स्पर्श प्रतिष्ठान यांनी आपल्या दि. ०३/०८/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे , मे. ऑर्गनिक यांनी आपल्या दि. ०७/०८/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे, मे.अक्षय इंजिनिअर्स यांनी आपल्या दि. ०८/०८/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे मे. एंगार्ज कन्सल्टंट व मे. अजिंक्यतारा कन्सल्टंट यांनी आपल्या दि. ११/०८/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे मे. पी.एम.ए. आर्किटेक्ट हयांनी आपल्या दि. १४/०८/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे सदर निम्नत्तम दराने काम करणेची तयारी दर्शविली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा. आयुक्त हयांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा. आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वृंदेश रघुनाथ पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पद्माकर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. ११/०९/२०१७ ते दि.१७/०९/२०१७ व दि. १८/०९/२०१७ ते २४/०९/२०१७ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त मा.स्थायी समिती च्या माहितीसाठी | ठराव :- सदरबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रस्तावातील माहिती व सभागृहातील चर्चा मा.स्थायी समिती सभेत अवलोकन केली व त्यानुसार संबंधितांने नोंद घेवून कार्यवाही करणेस सभेने एकमताने मंजुरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा संजय लोपीस सूचक :- मा.श्री. सुदेश प्रभाकर चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका